महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३२३ वे | दिनांक : २४/११/२०२६ | वार : मंगळवार

७ डिसेंबरपासून मनोज जरांगेंचा महाराष्ट्र दौरा; ४ ते ५ टप्प्यांत सर्व जिल्ह्यांना भेटी देणार



जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी आता राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा केली आहे. मराठा समाजातील नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र मिळवताना येणाऱ्या अडचणी, कुणबी नोंदी असूनही प्रमाणपत्र न मिळणे आणि कास्ट व्हॅलिडिटी प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या अडथळ्यांचा आढावा ते या दौऱ्यात घेणार आहेत. येत्या ७ डिसेंबरपासून त्यांच्या महाराष्ट्र दौऱ्याला सुरुवात होणार असून, चार ते पाच टप्प्यांत राज्यातील सर्व जिल्ह्यांना भेटी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आंदोलन सुरू असतानाच समाजातील अनेक विद्यार्थी, नोकरीसाठी प्रयत्न करणारे उमेदवार आणि नागरिकांना आरक्षणाच्या लाभासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मिळवताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः कुणबी नोंदी उपलब्ध असूनही संबंधितांना प्रमाणपत्र मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही ठिकाणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतरही कास्ट व्हॅलिडिटी मिळवण्याच्या प्रक्रियेत अडथळे येत असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर केवळ आंदोलनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जिल्ह्यांमध्ये जाऊन या समस्यांची माहिती घेण्याचा निर्णय जरांगे यांनी घेतला आहे. या दौऱ्यात प्रत्येक जिल्ह्यासाठी एक दिवस राखून ठेवण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यातील मराठा बांधवांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या जातील. विशेषतः ज्यांच्या जुन्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, मात्र अद्याप प्रमाणपत्र मिळालेले नाही, अशा नागरिकांच्या प्रकरणांची माहिती घेतली जाणार आहे. तसेच हैदराबाद गॅझेटच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र मिळाले आहे किंवा नाही, प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना कोणत्या अडचणी येत आहेत आणि प्रशासनाकडून काय प्रतिसाद मिळत आहे, याचाही आढावा घेतला जाणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या या महाराष्ट्र दौऱ्याचा सविस्तर कार्यक्रम १ डिसेंबर रोजी जाहीर केला जाणार आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करण्याच्या दृष्टीने दौऱ्याचे चार ते पाच टप्प्यांत नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील मराठा समाजाच्या नागरिकांना आपापल्या समस्या मांडण्यासाठी वेळ दिला जाणार आहे. त्यामुळे कुणबी प्रमाणपत्र, नोंदींची पडताळणी आणि कास्ट व्हॅलिडिटीसंदर्भात अडचणी असलेल्या मराठा बांधवांनी दौऱ्यादरम्यान प्रत्यक्ष भेटून आपली बाजू मांडावी, असे आवाहन जरांगे यांनी केले आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात मनोज जरांगे यांनी आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले होते.

SIR अंतर्गत २८-२९ नोव्हेंबरला मतदार नोंदणी शिबिरे



मुंबई : मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) 2026 कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगाने नव्याने गणना प्रपत्र (Enumeration Form) उपलब्ध करून दिले आहे. नागरिकांच्या सोयीसाठी येत्या २८ आणि २९ नोव्हेंबर २०२६ रोजी संबंधित मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. पात्र मतदारांनी या शिबिरांचा लाभ घेऊन मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहन महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले आहे. मुंबई महानगरपालिका मुख्यालयात सोमवारी (२३ नोव्हेंबर) मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे आणि महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत SIR कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा तसेच मतदारांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेण्यात आला. SIR कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीमध्ये अनेक पात्र मतदारांची नावे समाविष्ट नसल्यास त्यांना नाव नोंदणीची संधी देण्यात येत आहे. अशा मतदारांसाठी भारत निवडणूक आयोगाने नव्याने गणना प्रपत्र उपलब्ध करून दिले आहे. या प्रपत्राच्या माध्यमातून पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. यासाठी २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी संबंधित मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे घेतली जाणार आहेत. त्यामुळे प्रारूप यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांनी आपल्या संबंधित मतदान केंद्रावर जाऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या आढावा बैठकीला अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) प्राजक्ता वर्मा-लवंगारे, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे उपस्थित होते. तसेच अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि सह आयुक्त (करनिर्धारण व संकलन) विश्वास शंकरवार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत SIR कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक बाबींवर चर्चा करण्यात आली.

१५० कोटींच्या आरोपांवर संजय शिरसाटांचा पलटवार; राऊतांना समज देण्याची मागणी

छत्रपती संभाजीनगर : राहुल नार्वेकरांनी जबरदस्तीने काही जमिनी बळकावल्या असल्याच्या तक्रारी जर संजय राऊत यांच्याकडे आल्या असतील आणि त्या अनुषंगाने त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले असेल, तर मुख्यमंत्री त्यावर नक्कीच चौकशी करतील. परंतु, हे आरोप खोटे निघाले, तर नार्वेकर हे स्वतः वकील आहेत, ते राऊतांना योग्य ती समज देतील, असे प्रत्युत्तर मंत्री संजय शिरसाट यांनी दिले आहे. संजय शिरसाट म्हणाले की, गरीब शेतकरी कुटुंबीयांना देण्यात आलेल्या जमिनी या केवळ कसण्यासाठी आहेत. मात्र, अनेक ठिकाणी या जमिनी बिल्डर आणि भूमाफियांनी विकत घेतल्याचे किंवा हडप करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सरकारने आता यावर ठोस निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. ज्या जमिनींवर सलग ३ वर्षे कोणतेही पीक घेतले गेले नाही, अशा जमिनी सरकार आता परत ताब्यात घेणार आहे. शेकडो एकर जमिनी आज बिल्डर आणि भूमाफियांच्या ताब्यात असून, त्यांना चाप लावण्यासाठी सरकारने ही पावले उचलली आहेत. संजय शिरसाट म्हणाले की, डिलिमिटेशन बिलासाठी दीडशे कोटी रुपये दिल्याचा आरोप संजय राऊत करत आहेत. मग काय सुप्रिया सुळे यांनाही दीडशे कोटी रुपये दिले का? काँग्रेसचे नेते चव्हाण यांनीही डिलिमिटेशनचे समर्थन केले आहे, मग त्यांनी पैसे घेऊन आमची वकिली केली का? सुप्रिया सुळे यांनी तर मला कोणाचाही फोन आला नाही असे थेट सांगून राऊतांना तोंडघशी पाडले आहे. आकडे फुगवून सांगत समाजात संभ्रम कसा निर्माण होईल आणि खासदारांकडे लोक शंकेच्या नजरेने कसे पाहतील, यासाठी डिलिमिटेशनला पाठिंबा देणाऱ्या खासदारांना दीडशे कोटी रुपये मिळणार आहेत, असे खोटे पसरवण्याचे काम राऊतांकडून सुरू आहे. हा आकडा फक्त राऊतांनाच माहीत असतो, देशाच्या पंतप्रधानांनाही माहीत नसलेली गोष्ट त्यांच्याकडे आधी येते. असे राजकारण ते पहिल्यांदाच करत नाहीत, निवडणूक आयोग असो वा सर्वोच्च न्यायालय, प्रत्येक सरकारी यंत्रणेबद्दल संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जातो. त्यांचे हे आरोप बालिशपणाचे असून आम्ही त्यांच्याकडे गांभीर्याने पाहत नाही. राऊतांनी आता कितीही प्रयत्न केले, तरी ज्या आमदार-खासदारांना पक्ष सोडायचा आहे, ते त्यांना सोडून जातीलच. संजय शिरसाट म्हणाले की, कुर्ल्यात तरुण-तरुणीला झालेली मारहाण हा अत्यंत घृणास्पद प्रकार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६

अंदमान - निकोबारच्या राष्ट्रीय परिषदेत डॉ. अजय झिंजाडे यांना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार



छत्रपती संभाजीनगर : अंदमान - निकोबार येथे आयोजित बहुविषयक राष्ट्रीय संशोधन परिषदेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लासूर स्टेशन येथील छत्रपती शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. अजय झिंजाडे यांनी आपल्या उत्कृष्ट संशोधन सादरीकरणाच्या जोरावर 'सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण' या विभागात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयासह मराठवाड्याच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अंदमान - निकोबार येथे डॉ. अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशन (ए. सी. आर. एफ.), छत्रपती संभाजीनगर आणि सोसायटी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी, कल्याण, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संकल्पना' या मध्यवर्ती विषयावर बहुविषयक राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत डॉ. अजय झिंजाडे यांनी "मॅनेजमेंट ऑफ फ्युसेरियम वील्ट इन मराठवाडा फॉर सस्टेनेबल अँग्रीकल्चर" या विषयावर आपले संशोधन सादर केले. त्यांच्या सादरीकरणामध्ये मराठवाड्यातील विविध पिकांवर फ्युसेरियम या बुरशीमुळे होणाऱ्या मर रोगाचे स्वरूप, रोगकारक बुरशींची विविधता, रोगनियंत्रणाच्या प्रभावी पद्धती तसेच शाश्वत शेतीच्या दृष्टीने जैविक आणि पर्यावरणपूरक व्यवस्थापनाचे महत्त्व यावर प्रकाश टाकण्यात आला. शेती उत्पादनावर विपरीत परिणाम करणाऱ्या फ्युसेरियम मर रोगाच्या समस्येवर संशोधनाधारित आणि शाश्वत उपाययोजना विकसित करण्याच्या दृष्टीने त्यांचे संशोधन महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीला आणि संशोधनाच्या सादरीकरणाला परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली. परिणामी त्यांना या राष्ट्रीय परिषदेत सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरणाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या राष्ट्रीय परिषदेमध्ये देशाच्या विविध भागांतून 60 पेक्षा अधिक संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता, तर 30 संशोधकांनी आपले संशोधन पेपर सादर केले. डॉ. अजय झिंजाडे हे वनस्पतीशास्त्र विषयातील संशोधक असून त्यांचे संशोधन प्रामुख्याने फ्युसेरियम बुरशीची आनुवंशिक विविधता, वनस्पतींमध्ये होणारा मर रोग आणि त्याच्या शाश्वत व्यवस्थापनावर केंद्रित आहे. त्यांच्या संशोधन कार्याला यापूर्वीही शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात महत्त्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या पुरस्कारामुळे छत्रपती शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासूर स्टेशनच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी विभाग प्रमुख व वरिष्ठ प्राध्यापक डॉ. अशोक चव्हाण, प्राचार्य, डॉ. बाळासाहेब पवार, सहायक संचालक (वित्त) श्रीमती कुसुम चव्हाण, डॉ. श्रीकांत माने, सौ. वर्षा माने, संशोधक पल्लवी गवई, विशाल हिवाळे तसेच किशन कायंदे, संदीप दळवी, ईश्वर मिसाळ, अमर आहेर, कृष्णा लांडे आणि विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स

स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्रातील रिक्षा बंद आंदोलनाला ७० टक्के प्रतिसाद; दुपारी ३ वाजता रिक्षा सुरू करण्याचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्रात २३ नोव्हेंबर रोजी पुकारण्यात आलेल्या रिक्षा बंद आंदोलनाला सुमारे ७० टक्के प्रतिसाद मिळाल्याची माहिती विविध रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

आंदोलनादरम्यान

रिक्षाचालकांनी बंदमध्ये सहभागी होत आपला पाठिंबा दर्शविला. मात्र, दुपारी ३ वाजता रिक्षा पुन्हा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या आंदोलनात परिवर्तन रिक्षा चालक संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष शेख लतीफ, महाराष्ट्र प्रदेश सचिव शेख सरवर कॅप्टन, वस्ताद दल रिक्षा चालक संघटनेचे अध्यक्ष सुरेश जाधव, इमरान पटेल, भीम सेना रिक्षा चालक संघटना, मळीराम प्रधान, रिक्षा पंचायत समितीचे जिल्हाध्यक्ष गजानन वानखेडे, श्रमिक रिक्षा चालक संघटना आडे सरकार, महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना जाकेर पठाण, परिवर्तन रिक्षा चालक-मालक संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष आमजद खान, आझाद रिक्षा वाहतूक संघटना शेख मोहसिन, न्यू जनता रिक्षा युनियन अज्जू भाई, मराठवाडा रिक्षा चालक-मालक संघटना मोहसिन सर, पहिली महिला रिक्षाचालक अनिता कटकुरे, वाय. एफ. खान रिक्षा संघटना इमरान पठाण आदी संघटनांचे प्रतिनिधी व पदाधिकारी सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान रिक्षा चालकांच्या मागण्यांबाबत चर्चा करून पुढील दिशा ठरविण्यात आली. संबंधित मागण्यांवर १५ दिवसांच्या आत योग्य निर्णय घेऊन परिवर्तन समितीला लेखी स्वरूपात माहिती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

१५ दिवसांत निर्णय न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा

१५ दिवसांच्या कालावधीत रिक्षा चालकांच्या मागण्यांवर योग्य निर्णय घेऊन लेखी कळविण्यात आले नाही, तर ७ डिसेंबरनंतर परिवहन कार्यालयासमोर रिक्षा चालकांच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

रिक्षा चालकांच्या प्रश्नांवर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्या संघटनांनी केली आहे.

परिणय फुकेंचा रोहित पवारांवर हल्लाबोल; बारामती ॲग्रोतील शेतकऱ्यांचे थकीत पैसे देण्याची मागणी

नागपूर : हिवाळी अधिवेशनावर शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी मोर्चा काढण्याची तयारी करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) आमदार रोहित पवार यांच्यावर भाजप नेते परिणय फुके यांनी सोमवारी (२३ नोव्हेंबर) नागपुरातून जोरदार निशाणा साधला. "रोहित पवारांना खरोखरच शेतकऱ्यांबद्दल कळवळा आणि संवेदनशीलता असेल, तर त्यांनी पहिला मोर्चा स्वतःच्या बारामती ॲग्रोवर काढावा; कारण बारामती ॲग्रोने अनेक महिन्यांपासून शेतकऱ्यांचे पैसे थकवले आहेत. त्यांनी आधी तिथल्या शेतकऱ्यांचे पैसे द्यावेत आणि उसाचे भाव वाढवून द्यावेत," असा सणसणीत टोला फुके यांनी लगावला. यासोबतच गोवारी समाजाच्या ३२ व्या शहीद स्मृतिदिनानिमित्त बोलताना त्यांनी गोवारी आरक्षणाच्या लढ्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाकडे (कॉन्स्टिट्यूशनल बेंच) दाद मागणार असल्याचे जाहीर केले आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या दादागिरीविरोधात मोठी कारवाई केल्याची माहिती दिली. २३ नोव्हेंबर रोजी नागपुरात ११४ गोवारी बांधवांच्या ३२ व्या स्मृतिदिनानिमित्त श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर माध्यमांशी बोलताना परिणय फुके यांनी गोवारी आरक्षणाचा इतिहास आणि सद्यस्थिती मांडली. २४ एप्रिल १९८५ च्या अन्यायकारक शासन निर्णयामुळे (जीआर) गोवारी समाजाचे आरक्षण काढून घेण्यात आले होते. त्याविरोधात २३ नोव्हेंबर १९९४ रोजी संपूर्ण विदर्भातील गोवारी समाज रस्त्यावर उतरला असताना तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या सरकारने गोळीबाराचे आदेश दिले, ज्यात ११४ गोवारी बांधव शहीद झाले. गेल्या ३२ वर्षांपासून हा लढा सुरू असून मी स्वतः गेल्या १५ वर्षांपासून यात सहभागी आहे. मी आदिवासी विकास मंत्री असताना आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात आम्ही उच्च न्यायालयात ही केस जिंकली होती आणि राज्यभरातील लाखो गोवारी बांधवांना जात वैधता प्रमाणपत्रे (व्हॅलिडिटी) दिली होती. मात्र, त्यानंतर आलेल्या उद्धव ठाकरे, नाना पटोले आणि शरद पवार यांच्या महाविकास आघाडी सरकारने आमच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि तिथे गोवारी समाजावर अन्याय झाला. आता आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या घटनापीठाकडे (कॉन्स्टिट्यूशनल बेंच) पुनर्विचार याचिका दाखल करणार असून आम्हाला १०० टक्के न्याय मिळेल, असा विश्वास आहे. तोपर्यंत कैलास राऊत यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या माध्यमातून गोवारी बांधवांना अनुसूचित जमातीच्या (एसटी) धर्तीवर सर्व योजना, सोयीसुविधा आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याची व्यवस्था सरकारने केली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६

रामेश्वर गावाजवळ भीषण अपघात; दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर पासून 30 किलोमीटर अंतरावर असलेल्या औंढा नागनाथ तालुक्यातील रामेश्वर गावाजवळ रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुमारे ७.०५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच जिंतूर महामार्ग पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. अपघाताचे घटनास्थळ औंढा नागनाथ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असतानाही जिंतूर महामार्ग पोलिसांनी तत्परता दाखवत अपघातग्रस्तांना मदत केली.मिळालेल्या माहितीनुसार, भगवान कुंडलिक काळे (वय ३८) आणि महेंद्र रंगराव तळणकर (वय ३५), दोघेही रा. लाख, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली हे हिरो होंडा स्प्लेंडर प्लस (क्रमांक MH 38 Y 6761) या दुचाकीवरून प्रवास करीत होते. दरम्यान, रामेश्वर गावाजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत दोघेही गंभीर जखमी झाले. या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.अपघाताची माहिती मिळताच जिंतूर महामार्ग पोलीस पथकातील महिला पोलीस कर्मचारी आशा सावंत, पोलीस हवालदार एस. सय्यद आणि पोलीस अंमलदार बी. व्ही. गिराम यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले. मृत व्यक्तींना रुग्णवाहिकेद्वारे औंढा नागनाथ येथील रुग्णालयात पाठविण्यात आले.विशेष म्हणजे, सदर अपघाताचे घटनास्थळ औंढा नागनाथ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असले तरी जिंतूर महामार्ग पोलिसांनी कोणताही विलंब न करता घटनास्थळी पोहोचून मदतीचा हात दिला. महामार्गावरील अपघाताच्या प्रसंगी हद्दीचा विचार न करता नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर राहिलेल्या जिंतूर महामार्ग पोलीस पथकाच्या कार्याचे कौतुक होत आहे.दरम्यान, अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेण्यासह पुढील तपास औंढा नागनाथ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू आहे.

धम्मभूमी, बुद्ध लेणी येथे भदंत संघप्रिय थेरो यांचा कठिण चिवरदान सोहळा उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर : धम्मभूमी, बुद्ध लेणी येथील विपश्यना बुद्ध विहारात भदंत संघप्रिय थेरो यांचा कठिण चिवरदान सोहळा उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात संपन्न झाला. पूज्य भदंत विशुद्धानंदबोधी महास्थवीर यांच्या मार्गदर्शनाखाली भदंत संघप्रिय थेरो यांनी धम्मभूमी, बुद्ध लेणी येथील विपश्यना बुद्ध विहारात वर्षावास केला. वर्षावासाच्या पवित्र कालावधीत त्यांनी मिलिंद प्रश्न या ग्रंथाचे वाचन केले. तसेच उपासक-उपासिकांना आनापानसती आणि महामंगल सुत्त याविषयी मार्गदर्शन केले. याशिवाय शहरामध्ये भिक्षाटन व धम्मचारिका करून बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. या वर्षावासाची सांगता कठिण चिवरदान सोहळ्याने उत्साहपूर्ण वातावरणात झाली. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी तथागत बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून झाली. त्यानंतर भिक्खू संघाला भोजनदान, त्रिशरण-पंचशील ग्रहण, भिक्खू संघाचे स्वागत आणि धम्मदेसना असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. यावेळी धम्मदेसना करताना भन्ते आनंद यांनी वर्षावासाचे महत्त्व विशद केले. वर्षावास हा भिक्खू संघासाठी साधना, अध्ययन, चिंतन आणि धम्माचरण अधिक दृढ करण्याचा महत्त्वपूर्ण काळ आहे. या कालावधीत भिक्खू संघ एका ठिकाणी राहून धम्माचा अभ्यास व साधना करतो, तर उपासक-उपासिका धम्मश्रवण, शीलपालन आणि दानाच्या माध्यमातून पुण्यसंचय करतात. कठिण चिवरदान हे केवळ वस्त्रदान नसून त्यामागे श्रद्धा, त्याग, कृतज्ञता आणि दानपारमितेची भावना असल्याचे त्यांनी सांगितले. भिक्खू एस. हर्षबोधी महाथेरो यांनीही धम्मदेसना देताना वर्षावासाचे महत्त्व स्पष्ट केले. वर्षावास हा भिक्खू संघासाठी आत्मचिंतन, ध्यानसाधना, धम्मअभ्यास आणि प्रज्ञावृद्धीचा काळ आहे. या काळात भिक्खू संघ धम्माचे आचरण अधिक दृढ करतो, तर उपासक-उपासिका धम्मश्रवण, शीलपालन आणि दानधर्माच्या माध्यमातून आपले जीवन सदाचाराच्या मार्गावर नेऊ शकतात. प्रत्येकाने भगवान बुद्धांनी सांगितलेल्या धम्ममार्गाचे दैनंदिन जीवनात आचरण करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी भिक्खू संघाला कठिण चिवरासह विविध दान अर्पण करण्यात आले. संतोष वानखेडे आणि पुष्पा वानखेडे परिवाराच्या वतीने भिक्खू संघास चिवरदान करण्यात आले. तसेच विशुद्धानंदबोधी फाउंडेशनच्या वतीने भिक्खू संघास फळदान, चिवरदान व भोजनदान करण्यात आले. उपस्थित उपासक-उपासिकांसाठीही भोजनदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या सोहळ्याला पूज्य भदंत विशुद्धानंदबोधी महास्थवीर, भदंत एस. हर्षबोधी महाथेरो, भदंत नागसेनबोधी थेरो, भिक्खू करुणाबोधी, भिक्खू बोधिधम्म, भिक्खू बोधिरत्न, भिक्खू आनंद, भिक्खू रत्नबोधी, भिक्खू सुमितबोधी यांच्यासह भिक्खू संघाची उपस्थिती होती. कार्यक्रमास युवा उद्योजक प्रांतोष वाघमारे, पत्रकार अमरदिप हिवराळे, दादाराव सोनटक्के, अनिल नवगिरे, अनिल जावळे, रेशमा इंगळे, विशाखा नागरे, सिद्धार्थ भुजबळे, संतोष वानखेडे, पुष्पा वानखेडे, रत्नप्रभा इंगळे, कल्पना कावरे यांच्यासह मोठ्या संख्येने श्रद्धावान उपासक-उपासिका उपस्थित होते. पांढरी शुभ्र वस्त्रे परिधान करून उपस्थित राहिलेल्या उपासक-उपासिकांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शेवटी उपस्थित उपासक-उपासिकांसाठी भोजनदान करण्यात आले. बुद्ध धम्मातील दान, शील, करुणा आणि मैत्री या मूल्यांचा संदेश देणारा हा कठिण चिवरदान सोहळा उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत अॅडव्हेंचर कॅम्पसाठी



छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने आयोजित अॅडव्हेंचर कॅम्पमध्ये सहभागी होण्यासाठी राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका कु. अमनफातेमा झियाउल्हाक पटेल रवाना झाली.विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी, नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी तसेच साहसी वृत्ती, शिस्त, संघभावना आणि संकटांचा धैर्याने सामना करण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी अशा अॅडव्हेंचर कॅम्पचे विशेष महत्त्व आहे.या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सान्निध्यात विविध साहसी उपक्रमांचा अनुभव घेण्याची, नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची आणि इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.कु. अमनफातेमा हिची या अॅडव्हेंचर कॅम्पसाठी निवड होणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. तिच्या या सहभागामुळे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्याला निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व सहकार्यक्रमाधिकारी यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.हार्दिक अभिनंदन व पुढील साहसी प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६

असा चाललाय खेळ

कोणी जिंकल सहज
कोणी हरतच गेलं
झुंज अपयशी होता
जीनं वनवासी आलं

कोणा मिळाल्या रे टाळ्या
थेंब अमृताचे दोन
कोण्या भाळी अवकळा
जसं सतीचे रे दान

असा चाललाय खेळ
रोज डावपेच फार
हात खांद्यावर जरी
कसा पाठीवर वार

अशी रोज धडपड
पोळी आपली भाजण्या
अन् किती अवकळा
चोरी सारी लपवण्या

असे बदलले रंग
ऊन डोक्यावर येता
अन् फाटले मुखवटे
काळ हिशोब करता



ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

वृद्धत्वाच्या वाटेवर

जीवनात जगतांना,
सतत माणूस राबतो.
तरुणपणाची आठवण,
काढून रात्रभर जागतो. १

वृद्धत्वाच्या वाटेवर,
वास्तव सत्य कळते.
तरुणपणाची आठवण,
पुन्हा कोसो दूर पळते. २

पळत होतो कोणासाठी,
शेवटच्या टप्प्यात वाटले.
आठवण काढून रात्रभर,
हृदयाचा कप्पा फाटले. ३

वृद्धत्व असते अभिशाप,
आप्तस्वकीय छळतात.
हळूच आवाज दिल्यावर,
नकळत दूरवर पळतात. ४

वृद्धत्वाच्या वाटेवर,
मन मेंदू थकत जातात.
सरत्या शेवटी माणसं,
दु:खाचेच गीत गातात. ५



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

जिंतूर ग्रामीण रुग्णालयातील समस्यांचा डोंगर; रुग्णांचे हाल, आरोग्य सुविधांचा बोजवारा



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयातील विविध समस्यांमुळे रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करीत नगरपरिषदेच्या नगरसेवकांनी रुग्णालय प्रशासनाविरोधात आवाज उठवला आहे. रुग्णालयातील रिक्त वैद्यकीय पदे, बंद असलेल्या आरोग्य सुविधा, रुग्णवाहिकांना चालकांचा अभाव आणि आवश्यक उपचारांसाठी रुग्णांना परभणी येथे पाठविण्याची वेळ येत असल्याच्या गंभीर बाबी निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या आहेत. यासंदर्भात दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.निवेदनात नमूद केल्यानुसार, ग्रामीण रुग्णालयात सन २०१२ पासून एमएस पद रिक्त असल्याचे सांगण्यात आले असून, भूलतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ व अस्थिरोगतज्ज्ञ यांसारख्या महत्त्वाच्या तज्ज्ञ डॉक्टरांची पदेही रिक्त आहेत. त्यामुळे गंभीर आजारांच्या रुग्णांना आवश्यक उपचार मिळण्यात अडचणी येत असून त्यांना परभणी येथे पाठवावे लागत आहे.रुग्णालयात तीन रुग्णवाहिका उपलब्ध असतानाही चालक नसल्यामुळे रुग्णांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत असल्याची बाब निवेदनात मांडण्यात आली आहे. तसेच रुग्णालयातील डायलिसिस सेंटर बंद पडल्याने गरीब व गरजू रुग्णांना खासगी रुग्णालयात हजारो रुपये खर्च करून डायलिसिस करावे लागत असल्याचे म्हटले आहे.जिंतूर तालुक्यात सुमारे १७६ ते १७८ गावे असूनही येथे उपजिल्हा रुग्णालय व स्वतंत्र महिला रुग्णालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. रुग्णालयात सुमारे दोन कोटी रुपये खर्च करून ऑपरेशन थिएटर उभारण्यात आले असतानाही सिझेरियन शस्त्रक्रिया व कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया बंद असल्याबाबतही निवेदनात नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.याशिवाय तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरांची उपलब्धता नसणे, सोनोग्राफी सेंटर बंद असणे आणि कायमस्वरूपी वैद्यकीय अधीक्षकांचे महत्त्वाचे पद अनेक दिवसांपासून रिक्त असणे, अशा विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे.ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सुविधा तातडीने सुरू करून रिक्त पदे भरण्यात यावीत, रुग्णवाहिकांसाठी चालक उपलब्ध करून द्यावेत, डायलिसिस व सोनोग्राफी सेंटर सुरू करावे तसेच सिझेरियन आणि इतर शस्त्रक्रियांच्या सुविधा पूर्ववत कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.या सर्व मागण्यांची तातडीने दखल घेऊन कार्यवाही न झाल्यास संविधानिक मार्गाने पुढील आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या निवेदनाच्या प्रती जिल्हा शल्यचिकित्सक परभणी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधिकारी, आरोग्य सेवा उपसंचालक छत्रपती संभाजीनगर तसेच राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांना पाठविण्यात आल्या आहेत.निवेदनावर नगरसेवक तथा गटनेते इस्माईल सलीम शेख यांच्यासह नगरसेवक मोहम्मद माज मोहम्मद हकीम आणि सिमा परवीन वहिद खान यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.





महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६

गुरू नानक : समता, सेवा आणि मानवतेचा प्रकाश - डॉ. राजेंद्र बगाटे

मानवी संस्कृतीच्या इतिहासात काही महापुरुषांनी आपल्या विचारांनी, कार्याने आणि जीवनमूल्यांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी माणसामाणसांतील भेदभाव दूर करून प्रेम, करुणा, समानता, बंधुभाव आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार केला. अशा महान विभूतींमध्ये शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक देव यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या जीवनकार्यातून मानवतेचा व्यापक संदेश दिला. जातिभेद, धार्मिक कट्टरता, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता आणि निरर्थक कर्मकांड यांना विरोध करून त्यांनी सत्य, प्रामाणिकपणा, श्रमप्रतिष्ठा आणि सेवाभाव यांवर आधारित जीवनपद्धतीचा पुरस्कार केला. त्यांचे विचार कोणत्याही एका धर्माच्या चौकटीत मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारे आहेत. म्हणूनच गुरू नानक जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता आणि मानवतावादी मूल्यांचे स्मरण करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.पंधराव्या शतकातील भारतीय समाज अनेक सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक समस्यांनी ग्रासलेला होता. जातिव्यवस्थेतील उच्च-नीचतेच्या कल्पना, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, निरर्थक धार्मिक कर्मकांड आणि स्त्री-पुरुषांमधील असमानता यांमुळे समाजात मोठी दरी निर्माण झाली होती. धर्माच्या नावाखाली सामान्य माणसाचे शोषण होत होते. विविध धार्मिक समुदायांमध्ये परस्परांविषयी अविश्वास आणि संघर्षाची भावना वाढत होती. अशा परिस्थितीत समाजाला समतेचा, विवेकाचा आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या विचारवंतांची आवश्यकता होती. याच काळात गुरू नानक देव यांनी आपल्या शिकवणीतून सामाजिक परिवर्तनाची दिशा स्पष्ट केली. माणसाची ओळख त्याच्या जन्मावर, जातीवर किंवा धर्मावरून नव्हे, तर त्याच्या सदाचरणावर आणि मानवतावादी वृत्तीवरून ठरली पाहिजे, हा विचार त्यांनी समाजासमोर मांडला.गुरू नानक देव यांचा जन्म इ.स. १४६९ मध्ये पंजाबमधील तलवंडी या गावात झाला. हे गाव आज पाकिस्तानमध्ये ननकाना साहिब या नावाने ओळखले जाते. त्यांच्या वडिलांचे नाव मेहता कालू आणि आईचे नाव माता तृप्ता होते. त्यांच्या जन्मतारखेबाबत ऐतिहासिक नोंदी आणि शीख धर्मातील पारंपरिक मान्यता यांमध्ये मतभिन्नता आढळते. काही जुन्या ऐतिहासिक नोंदी आणि जन्मसाखी परंपरांमध्ये त्यांचा जन्म वैशाख महिन्यात झाल्याचा उल्लेख आढळतो; तर शीख समाजातील प्रचलित धार्मिक परंपरेनुसार त्यांचा जन्म कार्तिक पौर्णिमेला झाला असे मानले जाते. त्यामुळे दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला त्यांची जयंती 'गुरुपुरब' किंवा 'प्रकाश पर्व' म्हणून साजरी केली जाते. यंदा २४ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांची ५५७ वी जयंती साजरी होत आहे. बालपणापासूनच नानक यांच्यामध्ये चिंतनशीलता, संवेदनशीलता आणि आध्यात्मिक जिज्ञासा दिसून येत होती. सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे ते सूक्ष्म निरीक्षण करीत असत. समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव यांविषयी त्यांच्या मनात प्रश्न निर्माण होत असत.गुरू नानक देव यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू म्हणजे 'एक ओंकार'. या संकल्पनेतून त्यांनी परमेश्वर एकच असून संपूर्ण विश्व त्याच सृष्टीचा भाग आहे, हा विचार मांडला. सृष्टीतील सर्व मानव एकाच परमसत्तेची निर्मिती असल्यामुळे त्यांच्यात भेदभाव करण्याला कोणताही नैतिक किंवा आध्यात्मिक आधार नाही, असे त्यांच्या शिकवणीतून स्पष्ट होते. परमेश्वराला विविध नावांनी संबोधले जात असले, तरी त्याचे स्वरूप एकच आहे. त्यामुळे धर्म, भाषा, जात आणि उपासनेच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या, तरी मानवतेचे मूलभूत नाते समान आहे. त्यांनी धार्मिक संकुचितपणापेक्षा व्यापक मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले. माणसाने स्वतःच्या श्रद्धेचे पालन करताना दुसऱ्याच्या श्रद्धेचाही आदर केला पाहिजे. धार्मिक विविधतेचा स्वीकार आणि परस्पर सहअस्तित्व हीच शांततापूर्ण समाजाची खरी ओळख आहे.गुरू नानक यांच्या शिकवणीत नामस्मरण, प्रामाणिक कष्ट आणि वाटून खाणे या तीन तत्त्वांना विशेष महत्त्व आहे. परमेश्वराचे स्मरण करणे, स्वतःच्या श्रमातून प्रामाणिकपणे उपजीविका करणे आणि आपल्या उत्पन्नातील काही भाग गरजू व्यक्तींसोबत वाटून घेणे, ही त्यांच्या जीवनदृष्टीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या तत्त्वांना शीख परंपरेत 'नाम जपो, किरत करो आणि वंड छको' असे संबोधले जाते. या शिकवणीत आध्यात्मिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर समन्वय आढळतो. केवळ प्रार्थना किंवा उपासना करून माणूस धार्मिक ठरत नाही, तर त्याच्या दैनंदिन व्यवहारात प्रामाणिकपणा, परिश्रम आणि परोपकार असणे आवश्यक आहे. श्रमाला प्रतिष्ठा देणे आणि श्रमाच्या उत्पन्नातून इतरांच्या कल्याणाचा विचार करणे हा त्यांचा संदेश आजच्या आर्थिक विषमतेच्या काळात विशेष महत्त्वाचा ठरतो.समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यतेच्या प्रवृत्तींना गुरू नानक देव यांनी स्पष्ट विरोध केला. जन्माच्या आधारावर कोणतीही व्यक्ती श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत नाही. प्रत्येक व्यक्तीला समान प्रतिष्ठा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन त्याच्या कर्मावरून आणि आचरणावरून झाले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना सन्मानाने जगण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. जात, धर्म किंवा सामाजिक स्थानाच्या आधारावर एखाद्या व्यक्तीला कमी लेखणे हे मानवतेच्या विरोधात आहे. त्यांच्या या विचारांनी सामाजिक समतेची जाणीव अधिक व्यापक केली. आजही जातीय भेदभाव, अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार आणि विविध प्रकारच्या विषमता समाजात आढळतात. त्यामुळे सामाजिक न्याय आणि समतेच्या स्थापनेसाठी गुरू नानक यांच्या विचारांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.स्त्री-पुरुष समानतेविषयी गुरू नानक देव यांची भूमिका अत्यंत प्रगत आणि मानवतावादी होती. तत्कालीन समाजात स्त्रियांना अनेक सामाजिक बंधनांना सामोरे जावे लागत होते. स्त्रीचे स्थान दुय्यम मानण्याची प्रवृत्ती प्रबळ होती. अशा परिस्थितीत त्यांनी स्त्रीच्या प्रतिष्ठेचा आणि योगदानाचा गौरव केला. स्त्रीच्या उदरातूनच राजे, विद्वान आणि महान व्यक्ती जन्माला येतात, मग तिला कमी का लेखावे, असा आशय त्यांच्या वाणीमध्ये व्यक्त झाला आहे. स्त्री ही समाजाच्या निर्मितीतील महत्त्वाची घटक आहे. तिच्या अस्तित्वाचा, कर्तृत्वाचा आणि अधिकारांचा सन्मान केला पाहिजे, ही भूमिका त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते. आज महिला शिक्षण, विज्ञान, राजकारण, प्रशासन, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देत आहेत. तरीही स्त्रीभ्रूणहत्या, बालविवाह, हुंडाप्रथा, कौटुंबिक हिंसा आणि स्त्रीविषयक भेदभाव यांसारख्या समस्या कायम आहेत. अशा परिस्थितीत स्त्रीला समान प्रतिष्ठा देण्याचा गुरू नानक यांचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.गुरू नानक यांच्या शिकवणीतून विकसित झालेली लंगरची परंपरा ही सामाजिक समतेचे अत्यंत प्रभावी प्रतीक आहे. गुरुद्वारांमध्ये सर्व जाती, धर्म, वर्ग आणि आर्थिक स्तरांतील लोकांनी एकाच पंगतीत बसून भोजन करणे, हे या परंपरेचे वैशिष्ट्य आहे. येथे कोणताही भेदभाव केला जात नाही. प्रत्येक व्यक्तीला समानतेने भोजन दिले जाते. लंगर ही केवळ अन्नदानाची व्यवस्था नसून सामाजिक विषमता दूर करण्याचा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. या व्यवस्थेत भोजन तयार करणे, वाढणे, स्वच्छता करणे आणि इतर कामे स्वयंसेवकांच्या सहभागातून केली जातात. या सेवाकार्यातून श्रमप्रतिष्ठा आणि सामूहिक उत्तरदायित्वाची भावना विकसित होते. अन्न ही प्रत्येकाची मूलभूत गरज आहे आणि कोणालाही उपाशी राहू देऊ नये, हा व्यापक मानवतावादी संदेश या परंपरेतून मिळतो. आज जगात एका बाजूला अन्नाची नासाडी होत असताना दुसऱ्या बाजूला अनेकांना दोन वेळचे अन्न मिळत नाही. अशा परिस्थितीत लंगरची परंपरा सामाजिक सहकार्याचा आदर्श ठरते.धर्माच्या नावाखाली प्रचलित असलेल्या अंधश्रद्धा, निरर्थक कर्मकांड आणि बाह्य प्रदर्शनांवरही गुरू नानक देव यांनी टीका केली. त्यांच्या मते, धर्माचा खरा अर्थ समजून न घेता केवळ रूढी आणि परंपरांचे अनुकरण करणे योग्य नाही. एखादी व्यक्ती धार्मिक विधी करते; परंतु तिच्या वर्तनातून इतरांचे शोषण होत असेल, तर तिचे धार्मिक आचरण अपूर्ण आहे. मनात दया, करुणा, सत्य आणि प्रामाणिकपणा नसताना बाह्य धार्मिक आचारांना विशेष अर्थ उरत नाही. धर्म हा माणसाला माणसापासून दूर करणारा नसून त्यांच्यात प्रेम, सहकार्य आणि परस्पर आदर निर्माण करणारा असावा. त्यांनी विवेकपूर्ण श्रद्धेला महत्त्व दिले. धार्मिक कट्टरतेऐवजी सहिष्णुता आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. आज धर्माच्या नावावर निर्माण होणारे सामाजिक तणाव, द्वेषपूर्ण वक्तव्ये आणि संघर्ष लक्षात घेता त्यांची शिकवण शांततापूर्ण सहजीवनासाठी मार्गदर्शक ठरते.गुरू नानक देव यांनी आपल्या विचारांचा प्रसार केवळ उपदेशापुरता मर्यादित ठेवला नाही. त्यांनी भारतातील विविध प्रदेशांसह दूरवरच्या भागांत प्रवास करून लोकांशी संवाद साधला. त्यांच्या या प्रवासांना 'उदासिया' असे संबोधले जाते. या प्रवासांमध्ये त्यांनी विविध धर्मांचे अनुयायी, संत, विद्वान आणि सामान्य नागरिक यांच्याशी विचारविनिमय केला. त्यांनी लोकांना सत्याचा मार्ग स्वीकारण्याचे, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे आणि समाजातील दुर्बल घटकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रवासातून धार्मिक सहिष्णुता, संवाद आणि सामाजिक समन्वय यांची व्यापक परंपरा विकसित झाली. विविध भाषा, संस्कृती आणि श्रद्धा असलेल्या लोकांमध्ये सामंजस्य निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न महत्त्वपूर्ण होता. आज जागतिकीकरणाच्या काळात विविध समाज आणि संस्कृती एकमेकांच्या अधिक जवळ आल्या आहेत. अशा वेळी परस्पर आदर, संवाद आणि सहकार्य यांची आवश्यकता अधिक वाढली आहे.गुरू नानक देव यांच्या विचारांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी अध्यात्म आणि सामाजिक जीवन यांची सांगड घातली. आध्यात्मिक प्रगती साधण्यासाठी संसाराचा त्याग करणे आवश्यक नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. कुटुंबात राहून, व्यवसाय करून, प्रामाणिक श्रम करून आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडूनही माणूस आध्यात्मिक जीवन जगू शकतो. त्यामुळे त्यांनी गृहस्थाश्रम आणि श्रमप्रतिष्ठेला महत्त्व दिले. माणसाने आपल्या कर्तव्यांपासून दूर न जाता जीवनात नैतिकता आणि सदाचार जपावा, अशी त्यांची शिकवण होती. स्वतःच्या उन्नतीसोबतच इतरांच्या जीवनात आनंद, सुरक्षितता आणि सन्मान निर्माण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. अध्यात्म हे केवळ वैयक्तिक मुक्तीचे साधन नसून समाजकल्याणाचा मार्ग आहे, ही त्यांची व्यापक जीवनदृष्टी होती.निसर्गाविषयी आदर आणि पर्यावरणाशी सुसंवादी संबंध ठेवण्याची जाणीवही गुरू नानक यांच्या विचारांतून व्यक्त होते. हवा, पाणी, पृथ्वी आणि संपूर्ण सजीवसृष्टी ही मानवी जीवनाचा आधार आहे. त्यांच्या वाणीतील वायूला गुरू, पाण्याला पिता आणि पृथ्वीला माता मानणारा आशय निसर्गाविषयीची कृतज्ञता व्यक्त करतो. निसर्ग हा केवळ मानवी उपभोगाचे साधन नसून जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आज जंगलतोड, जलप्रदूषण, वायुप्रदूषण, हवामानबदल आणि नैसर्गिक संसाधनांचा अमर्याद वापर यांमुळे पर्यावरणीय संकट गंभीर बनले आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचे संतुलन बिघडत असेल, तर असा विकास शाश्वत ठरू शकत नाही. गुरू नानक यांची निसर्गाविषयक जाणीव आजच्या पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना नैतिक आधार देणारी आहे.गुरू नानक देव यांच्या विचारांचा प्रसार त्यांच्या वाणी आणि रचनांमधून झाला. त्यांच्या रचनांना शीख धर्माच्या पवित्र 'गुरू ग्रंथ साहिब' या धर्मग्रंथात महत्त्वाचे स्थान आहे. या ग्रंथात विविध संत आणि भक्तांच्या रचनांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे गुरू ग्रंथ साहिब हा भारतीय संतपरंपरेतील विविध विचारप्रवाहांना जोडणारा महत्त्वपूर्ण सांस्कृतिक दस्तऐवज मानला जातो. गुरू नानक यांच्या वाणीमध्ये भक्ती, प्रेम, सत्य, नैतिकता, समता आणि सामाजिक न्याय यांचा विचार आढळतो. माणसाने अहंकार, लोभ, मत्सर आणि द्वेष यांसारख्या प्रवृत्तींपासून दूर राहून निर्मळ अंतःकरणाने जीवन जगावे, अशी प्रेरणा त्यांच्या रचनांमधून मिळते.गुरू नानक देव यांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात पंजाबमधील रावी नदीच्या परिसरातील करतारपूर येथे वास्तव्य केले. तेथे त्यांनी श्रम, भक्ती, सामूहिक जीवन आणि सेवाभाव यांवर आधारित जीवनपद्धती विकसित केली. आपल्या विचारांचा वारसा पुढे चालविण्यासाठी त्यांनी गुरू अंगद देव यांची उत्तराधिकारी म्हणून नियुक्ती केली. इ.स. १५३९ मध्ये करतारपूर येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात शीख धर्माच्या पुढील गुरूंनी त्यांच्या शिकवणीचा प्रसार केला. गुरू नानक यांनी मांडलेली मानवतावादी विचारधारा पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाला प्रेरणा देत राहिली.गुरू नानक जयंतीला 'प्रकाश पर्व' असेही संबोधले जाते. कार्तिक पौर्णिमेला हा उत्सव साजरा केला जातो. या दिवशी देशभरातील गुरुद्वारांमध्ये विशेष प्रार्थना, गुरुबाणीचे पठण, कीर्तन, धार्मिक प्रवचने आणि लंगरचे आयोजन केले जाते. अनेक ठिकाणी नगरकीर्तन काढले जाते. गुरुद्वारांची आकर्षक सजावट केली जाते. अनुयायी सेवाकार्यात सहभागी होऊन समाजाप्रती आपली बांधिलकी व्यक्त करतात. अनेक ठिकाणी प्रभातफेऱ्या काढल्या जातात. गुरू ग्रंथ साहिबचे अखंड पठण केले जाते. विविध धर्मांचे आणि समुदायांचे लोकही या उत्सवात सहभागी होतात. त्यामुळे गुरू नानक जयंती धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणारा दिवस ठरतो. यंदा २४ नोव्हेंबर रोजी हा उत्सव साजरा होत असून देशभरातील शीख बांधवांसाठी हा दिवस विशेष आनंदाचा आणि श्रद्धेचा आहे.आजच्या एकविसाव्या शतकातील समाजजीवनाचा विचार केला, तर गुरू नानक देव यांच्या विचारांची प्रासंगिकता अधिक प्रकर्षाने जाणवते. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि उद्योगक्षेत्रात मानवाने मोठी प्रगती केली आहे. दळणवळणाच्या साधनांमुळे जग जवळ आले आहे; मात्र माणसामाणसांतील भावनिक अंतर अनेकदा वाढताना दिसते. आर्थिक विषमता, बेरोजगारी, जातीय संघर्ष, धार्मिक कट्टरता, भ्रष्टाचार, हिंसाचार आणि पर्यावरणीय असमतोल या समस्या समाजासमोर आहेत. भौतिक सुखसोयी वाढल्या असल्या, तरी मानवी संवेदनशीलता, सामाजिक सहकार्य आणि उत्तरदायित्व यांना अपेक्षित महत्त्व मिळत नाही. अशा परिस्थितीत गुरू नानक यांचे सत्य, समता, प्रामाणिक श्रम, वाटून खाणे आणि सेवाभावाचे विचार समाजाला योग्य दिशा देऊ शकतात.विशेषतः तरुण पिढीने गुरू नानक देव यांच्या जीवनातून श्रमप्रतिष्ठा, प्रामाणिकपणा, विवेकशीलता आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. यशस्वी होण्यासाठी शॉर्टकट न शोधता परिश्रम, ज्ञान आणि नैतिकतेच्या आधारावर प्रगती साधली पाहिजे. स्वतःच्या यशाबरोबरच समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांच्या उन्नतीसाठी योगदान दिले पाहिजे. शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक आर्थिक प्रगतीसाठी न करता सामाजिक प्रश्न समजून घेण्यासाठी आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी झाला पाहिजे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून अफवा आणि द्वेष पसरविण्याऐवजी सत्य, विवेक आणि सामाजिक सलोखा यांचा प्रसार करणे हीदेखील आजच्या पिढीची जबाबदारी आहे.गुरू नानक देव यांचा संदेश संपूर्ण मानवजातीसाठी आहे. त्यांच्या विचारांचा गाभा म्हणजे माणसाने माणसाशी माणुसकीने वागावे आणि प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आदर करावा. समाजात शांतता प्रस्थापित करायची असेल, तर परस्परांविषयी आदर, सहिष्णुता आणि संवादाची भावना वाढवावी लागेल. सामाजिक न्याय प्रस्थापित करायचा असेल, तर प्रत्येकाला समान संधी आणि सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. आर्थिक विषमता कमी करायची असेल, तर श्रमाचा सन्मान आणि सामाजिक सहकार्याला महत्त्व द्यावे लागेल. या सर्व मूल्यांचा समन्वय गुरू नानक यांच्या शिकवणीत आढळतो.गुरू नानक जयंती साजरी करणे म्हणजे केवळ त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करणे किंवा धार्मिक कार्यक्रमांत सहभागी होणे एवढ्यापुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या विचारांचा आपल्या दैनंदिन जीवनात स्वीकार करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आपण आपल्या व्यवहारात प्रामाणिकपणा जपतो का, इतरांच्या दुःखाची जाणीव ठेवतो का, जातीय आणि धार्मिक भेदभावापासून दूर राहतो का, स्त्रियांना समान सन्मान देतो का आणि गरजू व्यक्तींना मदतीचा हात देतो का, याचे आत्मपरीक्षण या निमित्ताने झाले पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या परीने सेवाभाव जोपासला, तर सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक गतिमान होऊ शकते.गुरू नानक देव यांचे जीवन आणि विचार आपल्याला शिकवतात की, माणसाचे खरे मोठेपण त्याच्या संपत्तीत, सत्तेत किंवा प्रतिष्ठेत नसून त्याच्या मानवतावादी आचरणात असते. सत्याचा मार्ग, प्रामाणिक श्रम, समानतेची भावना, परोपकार आणि सर्वांच्या कल्याणाची इच्छा हीच समृद्ध समाजाची खरी पायाभरणी आहे. आज जगाला संघर्षापेक्षा सहकार्याची, द्वेषापेक्षा प्रेमाची, विषमतेपेक्षा समतेची आणि स्वार्थापेक्षा सेवाभावाची अधिक गरज आहे. गुरू नानक यांनी शेकडो वर्षांपूर्वी दिलेला मानवतेचा संदेश आजही तितकाच जिवंत आणि मार्गदर्शक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा केवळ गौरव न करता ते प्रत्यक्ष जीवनात उतरविण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. प्रेम, समता, सेवा आणि बंधुभावावर आधारित समाजनिर्मिती करणे, हीच गुरू नानक देव यांच्या विचारांना साजेशी खरी आदरांजली ठरेल.

डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक,
समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com